2 1 MAR 2026

जनप्रवास

# विद्यापीठात आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिराचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा भौतिकशास्त्र विभाग, नीम करौली बाबा चॅरिटेबल ट्रस्ट (कोल्हापूर) आणि छत्रपती प्रमिलाराजे (सीपीआर) रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, २४ मार्च रोजी भव्य 'आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे' आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १०.१५ वाजता उद्घाटन समारंभसाठी जिल्हाधिकारी अमोल येडगे, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, व्यवस्थापन परिषदेचे स्वागत पिरुळकर, भौतिकशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. आर.जी. सोनकवडे, नीम करौली बाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या शीतल सोनकवडे, अधिष्ठाता सीपीआर रुग्णालय डॉ. सदानंद भिसे, डॉ. भूषण मिरजे असणार आहेत.

2 1 MAR 2026

पुढारी

# दु. का. संत जीवन-कार्य : २४ रोजी शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : मराठीतील ज्येष्ठ लेखक व संशोधक डॉ. दु.का. संत यांच्या नावे शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाच्या वतीने मंगळवार (दि. २४) रोजी सकाळी ११.३० वाजता डॉ. दु.का. संत व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. व्याख्यानमालेअंतर्गत 'डॉ.दु.का. संत जीवन आणि कार्य' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मराठी अधिविभागाचे माजी प्रमुख डॉ. अविनाश सांगोलकर यांचे व्याख्यान होणार आहे. उदयप्रकाश संत यांची प्रमुख उपस्थिती असेल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे असतील. व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

21 MAR 2026

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठामध्ये 'जीएसटी'बाबत सोमवारी चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे सोमवार, दि. २३ रोजी दोनदिवसीय जीएसटी (वस्तू आणि सेवा कर) याविषयी राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

वस्तू व सेवा कराचे आयुक्त सुरेंद्र माणकोस्कर यांच्यासह कलबुर्गी केंद्रीय विद्यापीठाचे प्रा. पांडुरंगा हे चर्चासत्राचे मुख्य मार्गदर्शक आहेत. विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी अध्यक्षस्थानी असतील. इतर सत्रांमध्ये सीए उमेश शर्मा, सीए गिरीश कुलकर्णी डिजिटायझेशन आणि वस्तू व सेवा कर यावर विवेचन करतील.

वस्तू व सेवा करातील सुधारणा व त्याचा व्यवसाय व ग्राहकांवर परिणाम या विषयावरील चर्चेत आयुक्त महेश जगताप, सीए गिरीश सामंत, व्यावसायिक अजित कोठारी, अंतर्गत लेखापरीक्षक अजित चौगुले, सीए श्रीकांत बच्चे सहभाग घेतील. अध्यक्षस्थान प्रा. श्रीकृष्ण महाजन भूषवतील. वस्तू व सेवा कर यातील सुधारणा आणि व्यवसाय सुलभता या विषयावर प्रा. अंजू ताम्रगुंडी, प्राचार्य डॉ. नामदेव गवस विचार मांडतील. वस्तू व सेवा कर सुधारणा आणि डिजिटायझेशन या विषयावर कौशाली इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, डॉ. रमेश कुलकर्णी डॉ. आर. के. टेलर हे मार्गदर्शन करतील.

2 1 MAR 2026
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'जीएसटी' सुधारणांबाबत सोमवारपासून राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे सोमवार (ता. २३) पासून दोन दिवसीय जीएसटी (वस्तू आणि सेवा कर) याविषयी राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. 'जीएसटी सुधारणा, त्याचे परिणाम आणि विकसित भारत २०४७' यावर जीएसटी क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

वस्तू व सेवा कराचे आयुक्त सुरेंद्र मानकोस्कर यांच्यासह कलबुर्गी केंद्रीय विद्यापीठाचे प्रा. पांडुरंगा मुख्य मार्गदर्शक आहेत. विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी अध्यक्षस्थानी असतील. इतर सत्रांमध्ये छत्रपती संभाजीनगर येथील सीए उमेश शर्मा, कोल्हापूरमधील सीए गिरीश कुलकर्णी हे 'डिजिटायझेशन आणि वस्तू व सेवा कर' यावर विवेचन करतील. वस्तू व सेवा करातील सुधारणा व त्याचा व्यवसाय, ग्राहकांवर परिणाम यावर विशेष चर्चेचे आयोजन केले आहे. यामध्ये आयुक्त महेश जगताप, सीए गिरीश सामंत, व्यावसायिक अजित कोठारी, अंतर्गत लेखापरीक्षक अजित चौगुले, सीए श्रीकांत बच्चे चर्चेत सहभाग घेतील. प्रा. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी असतील.

वस्तू व सेवा कर यातील सुधारणा आणि व्यवसाय सुलभता यावरील सत्रामध्ये धारवाड येथील प्रा. अंजू ताम्रगुंडी, गोवा येथील प्राचार्य डॉ. नामदेव गवस विचार मांडतील. वस्तू व सेवा कर सुधारणा आणि डिजिटायझेशन यावरील सत्रामध्ये कौशाली इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (धारवाड) येथील डॉ. रमेश कुलकर्णी, सायबर इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. आर. के. टेलर मार्गदर्शन करतील. उपस्थित विद्यार्थी, प्राध्यापक व व्यावसायिक हे 'वस्तू व सेवा कर तसेच व्यवसाय सुलभता आणि डिजिटायझेशन' या विषयावर शोधनिबंधांचे सादरीकरण करणार आहेत. सुमारे ५० सहभागी सदस्य शोधनिबंध सादर करणार आहेत. या चर्चासत्राचा कर व्यावसायिक, उद्योजक, विद्यार्थी यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. महाजन यांनी केले आहे.

21 MAR 2026

जनप्रवास

# जीएसटी सुधारणांबाबत सोमवारपासून चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे सोमवारी दोन दिवसीय 'जीएसटी' (वस्तू आणि सेवा कर) याविषयी राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या चर्चासत्रात जीएसटी सुधारणा, त्याचे परिणाम आणि 'विकसित भारत २०४७' या मुद्द्यावर जीएसटी क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. वस्तू व सेवा कराचे आयुक्त सुरेंद्र माणकोस्कर यांच्यासह कलबुर्गी केंद्रीय विद्यापीठाचे प्रा. पांडुरंगा हे चर्चासत्राचे मुख्य मार्गदर्शक आहेत. विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी अध्यक्षस्थानी असतील. इतर सत्रांमध्ये उमेश शर्मा व गिरीश कुलकर्णी विवेचन करतील.

2 1 MAR 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात सोमवारपासून राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग आणि भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने जीएसटी रिफॉर्म्स, डिजिटायझेशन अँड इझ ऑफ डुईंग बिझनेस : मार्चिंग टुवर्डस् विकसित भारत २०४७ या विषयावर सोमवार, दि. २३ पासून दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. याचे उद्‌घाटन केंद्रीय जीएसटी व उत्पादन शुल्क प्रधान आयुक्त सुरेंद्र मानकोस्कर प्रमुख पाहुणे म्हणून तर केंद्रीय विद्यापीठ, कर्नाटक येथील डॉ. व्ही. पांडुरंग बीजभाषक म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी अध्यक्षस्थानी असतील. चर्चासत्रात सहभागी होण्याचे आवाहन डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

21 MAR 2026
सकाळ

# डॉ. सांगोलकर यांचे मंगळवारी व्याख्यान

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाच्या वतीने डॉ. दु. का. संत व्याख्यानमाला आयोजित केली आहे. या व्याख्यानमालेअंतर्गत मंगळवारी (ता. २४) सकाळी ११.३० वाजता 'डॉ. दु. का. संत जीवन आणि कार्य' यावर पुणे विद्यापीठातील मराठी अधिविभागाचे माजी प्रमुख डॉ. अविनाश सांगोलकर यांचे व्याख्यान होईल.